म.न.पा. ठराव कमांक 8 दिनांक 20.03.2017 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 30–3 नुसार गठीत गलिच्छ वस्ती निर्मुलन व घर बांधणी विशेष समिती ची सभा गुरुवार दिनांक 29.6.2017 रोजी दुपारी 04.00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती ,स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचे इतिवृत्त.

सभेत मा. सभापती श्रीमती चेतना राजु टांक, मा. उपसभापती श्रीमती वंदना वसंतराव यंगटवार , मा. सदस्य श्री सुनिल दुलीचंद हिरणवार मा. सदस्य श्रीमती रुतिका योगेश मसराम मा. सदस्या मा. सदस्या श्रीमती मंगला शशांक खेकरे मा. सदस्या श्रीमती स्नेहा विवेक निकोसे मा. सदस्य मा. उप निगम आयुक्त श्रीमती लाढे, अति. उप निगम आयुंक्त श्री देवतळे, कार्यकारी अभियंता स्लम श्री जांभुळकर तथा इतर अधिकारी उपस्थित होते.

मा. सभापती ने सभा की कार्यवाही सुरु की अधिकारी तथा प्रशासन की ओरसे दिखाई जा रही उदासीनता के प्रती नाराजी व्यक्त की ।

विषय कमांक 1 के अनुसार पुर्व मिटींग में दिये निर्देशों के बारे में जानकारी के विषय पर पिछली सभा में जो निर्देश दिये गये थे उसके अनुरुप विभाग व्दारा कोई भी कार्य किये जाने की जानकारी नही दी गई , जानकारी देने हेतू सक्षम अधिकारी उपस्थित नही था ,जो रहना चाहिये ऐसे निर्देश दिये । प्रशासन समिती के कार्यो को महत्व नही देता ऐसा प्रतीत होता है , ऐसी भावना समिती व्दारा व्यक्त की गई सभा मे झोन वाईज डिटेल जानकारी भी उपलब्ध नही थी ।

पिछली सभा में पब्लीक तक हम लोगों की बात, सारी योजनाओं की जानकारी भेजे जाने हेतु उपाय योजना के बारे में कहा गया था । झोपडपट्टी क्षेत्र में रहनेवाले लोगों के लिये योजनाए केन्द्र शासन, राज्य शासन, तथा महानगरपालिका की आरेसे संचालित कि जाती है इसकी जानकारी अंतिम लाभार्थी तक पहुचाने का कार्य विभाग व्दारा किया जाना चाहिये जिसके निर्देश पुर्व सभा मे दिये गये थे जिसपर कार्यवाही नही हुई । प्रशासन की ओरसे इस बाबत सुझाव तथा उसके अनुरुप कार्य करना, होना अपेक्षीत है , ऐसी अपेक्षा सभा में व्यक्त की गई । इस पर विभाग व्दारा बॅनर तयार कर सभी ओर लगाने के निर्देश दिये गये । इस संदर्भ विभाग व्दारा सभी को पत्र भेजे जाने की जानकारी दी गई इसपर समिती के सभी सदस्यों ने कोईभी पत्र विभाग व्दारा प्राप्त होने से इंकार किया ।

समाज भवन के बारे में मांगी जानकारी नही दि गई उप निगम आयुक्त ने सारी जानकारी जल्द ही देने की बात कही ।

समीती की ओरसे समिती के बॅनर तले स्लम विभाग मे वृक्षारोपन करने की मंशा व्यक्त की गई इसपर विभाग के व्दारा योग्य कार्यवाही किये जाने की निर्देश सभापती व्दारा दिये गये ।

इस समय विभाग की ओरसे रमाई आवाज योजना प्रधानमंत्री आवास योजना की जानकारी रखी गई ।

अगली सभा में गार्डन विभाग के प्रतिनिधी को बुलाया जाय ऐसे निर्देश सभा में दिये गये । अगली सभा में सभी अधिकारी संपूर्ण जानकारी, सुझाओं के साथ सभा में आये ऐसे भी निर्देश सभापती की ओरसे दिये गये ।

इसके बाद सभा के समापन की घोषणा की गई ।

निगम सचिव
नागपूर महानगरपालिका,नागपूर

सभापती
गलिच्छ वस्ती निर्मुलन व घर बांधणी विशेष समिती

म.न.पा ठराव क्र. 8 दिनांक 20.03.2017 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 30 (3) नुसार गठीत गलिच्छ वस्ती निर्मुलन व घर बांधणी विशेष समितीची सभा मंगळवार दिनांक 26/09/2017 रोजी दुपारी 12.00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली, त्या सभेतील चर्चेचा संक्षिप्त वृतांत.

सभेत मा.सभापती, गलिच्छ वस्ती निर्मुलन व घर बांधणी विशेष समिती श्रीमती चेतना टांक, मा.सदस्य श्री.सुनिल हिरणवार, मा.सदस्या,श्रीमती रुतिका मसराम, मा.सदस्या, श्रीमती दुर्गा हत्तीठेले, मा.सदस्या, श्रीमती.मंगला खेकरे तसेच प्रशासनाकडुन, कार्यकारी अभियंता (स्लम) श्री.जांभुळकर, कार्यकारी अभियंता (एस.आर.ए) श्री.पोहेकर, समाजकल्याण अधिकारी यांचे प्रतिनिधी तसेच संबंधित इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

मा.सभापती यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरुवात केली, सभेच्या सुरुवातीस मागच्या सभेत देण्यात आलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने समाजकल्याण विभागाच्या वतीने माहिती देतांना सांगण्यात आले की, दीनदयाल अंतोदय योजना–राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियाना अंतर्गत जनजागृती करण्याकरिता नागपूर महानगरपालिकेच्या 10 झोनमध्ये मोठे बॅनर लावण्यात आले आहे. सामाजिक प्रचार व प्रसार माध्यमाअंतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या अधिकृत फेसबुक पेज वर प्रसिध्दी सुध्दा करण्यात आली आहे. समुदाय संघटकाव्दारे कार्यरत झोन अंतर्गत नगरसेवकांना प्रत्यक्ष मुलाखती व्दारे अभियानाची माहिती देण्यात आली होती. प्लॅस्टीक टेक्नॉलॉजी अंतर्गत प्रशिक्षण देण्याकरिता लकडगंज झोनमध्ये एकदिवसीय कार्यशाळा घेण्यात आली होती. उपरोक्त प्रमाणे माहिती देण्यात आली.

यानंतर मा.सभापती यांनी प्रधान मंत्री आवास योजनेअंतर्गत सुरु असलेल्या कामाची माहिती विभागाला विचारली असता विभागाकडुन सांगण्यात आले की, या योजनेअंतर्गत दिनांक 22/02/2016 पासुन 30/04/2016 पर्यंत एकुन 72,013 घरांचे सर्व्हे करण्यात आले होते त्यातील 41,878 लोकांनी अर्ज सादर केले नागपूर शहराकरिता एन.आय.टी, म्हाडा, व महानगरपालिकेच्या माध्यमातुन घरांची बांधणी करण्यात येणार आहे. महानगरपालिके व्दारा तयार करण्यात आलेल्या मौजा नारा येथे घरांच्या संदर्भात मा.प्रधान सचिव यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे त्यात त्यांनी काही सुधारणा सुचविण्यात आल्या आहेत त्याप्रमाणे सुधारीत प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येईल. त्याचप्रमाणे केंद्र सरकारने ऑनलाईन नोंदणी करिता काही सेंटरला मान्यता प्रदान केली आहे त्याअंतर्गत 80,000 घरांची डिमांड आली आहे. महानगरपालिकेकडे 4 ठिकाणी जागा उपलब्ध आहे त्या जागेच्या संदर्भात प्रधान सचिव यांनी काही सुधारणा सुचविल्या आहेत त्या प्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्यात येणार आहे.

यावर मा.सभापती यांनी विभागाला निर्देश दिले की समितीच्या सदस्यांसोबत या सर्व जागांची पहाणी करण्याकरिता दौरा आयोजित करण्यात यावा. त्याचबरोबर एस.आर.ए. या योजनेअंतर्गत बांधण्यात येणा–या घरांच्या संदर्भात मोठया प्रमाणात नागरिकांकडुन तक्रारी प्राप्त होत आहे त्या ठिकाणी पुरेपुर नागरी सुविधा नसल्यामुळे त्यांना त्रास सोसावा लागत आहे याकडे सुध्दा विभागाने लक्ष देणे आवश्यक आहे.

नारा,एस.आर.ए. स्कीम अंतर्गत जी घरे बांधण्यात आली आहे तेथे रस्ते बरोबर नसल्यामुळे नागरिकांना जाण्यायेण्यास त्रास होत आहे त्या ठिकाणी पुरेपुर नागरी सुविधा पुरविण्याच्या संदर्भात मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याशी चर्चा करण्यात येईल असे सुचित करुन मा.सभापती यांनी सभा समाप्तीची घोषणा केली.

निगम सचिव
महानगरपालिका, नागपूर

सभापती
गलिच्छ वस्ती, निर्मुलन घरबांधणी विशेष समिती.

**म.न.पा. ठराव क्र.8 दिनांक 20.03.2017 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 30(3) नुसार गठीत गलिच्छ वस्ती निर्मुलन व घर बांधणी विशेष समितीची सभा बुधवार दि.10.01.2018 रोजी दुपारी 03.30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा संक्षिप्त वृतांत.**

**सभेत मा.सभापती, गलिच्छ वस्ती निर्मुलन व घर बांधणी विशेष समिती श्रीमती चेतना टांक, मा.उपसभापती श्रीमती वंदना यंगटवार, मा.सदस्य श्री.सुनिल हिरणवार, मा.सदस्या श्रीमती स्नेहा निकोसे, मा.सदस्य श्री मनोज सांगोळे, मा.उपायुक्त श्रीमती रंजना लाडे, समाजकल्याण अधिकारी, कार्यकारी अभियंता श्री.जांभुळकर, कार्यकारी अभियंता श्री.वासनिक, सहा.आयुक्त हनुमाननगर झोन यांच्यातर्फे उपअभियंता श्री.हेडाउ, सहा.आयुक्त आशीनगर झोन यांच्यातर्फे उपअभियंता श्री.कडु तसेच संबंधित अधिकारी सभेत उपस्थित होते.**

मा.सभापती यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरुवात केली, सभेच्या सुरुवातीस विषय पत्रिकेवरील विषयाला सुरुवात करतांना सांगितले की, डी.पी. रस्ते व अन्य प्रकल्पा अंतर्गत महानगरपालिकेव्दारे सुरु/प्रस्तावित विकास कामाचे बाधीत होत असलेल्या घोषित झोपडपट्टीतील झोपडीवासीयांचा विभागातर्फे माहिती देण्यात यावी.

यावर कार्यकारी अभियंता श्री.वासनिक यांनी माहिती देतांना सांगितले की, गितांजली ते रजवाडा पॅलेस या डिपी रोडमध्ये 68 झोपडपट्टीवासी बाधीत होत असल्याची माहिती दिली.

मा.सदस्य श्री.सुनिल हिरणवार यांनी सुचित केले की, डी.पी. रस्ते व अन्य प्रकल्पा अंतर्गत काही प्रशासकीय अडचणी येत असल्यास मा.आयुक्त महोदय किंवा आवश्यकता पडल्यास मा.पालकमंत्री महोदय, यांची मदत घेवुन त्या अडचणी त्वरीत दुर कराव्यात.

प्रधानमंत्री आवास योजनेच्या संदर्भात संबंधित अधिकारी यांनी माहिती देतांना सांगितले की, या प्रधानमंत्री आवास योजनेकरीता महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्रीय विकास प्राधीकरण (म्हाडा) ला नोडल एजन्सी म्हणुन नियुक्त केले आहे. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत आतापर्यंत 41,478 अर्ज संपुर्ण कागदपत्रासह विभागाला प्राप्त झाले आहे. 72,013 अर्ज हे इंटरनेटच्या माध्यमातुन ऑनलाईन प्राप्त झाले आहे, प्राप्त झालेल्या अर्जाची तपासणी करण्यात येईल त्यांनंतर या संदर्भात डी.पी.आर. तयार करण्यात येईल या सर्व प्रक्रीयेला किमान 1 वर्षाचा कालावधी लागेल, मौजा नारी मध्ये 3 जागा महानगरपालिकेने सुचविल्या आहेत, 1,118 घरांचा प्रस्ताव महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्रीय विकास प्राधीकरणाकडे पाठविला आहे. तसेच या संदर्भात मा.जिल्हाधिकारी कार्यालयाशी सुध्दा जागा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

मा.सदस्य श्री.मनोज सांगोळे यांनी सुचित केले की, प्रधानमंत्री आवास योजनेच्या संदर्भात नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती, महानगरपालिका आयुक्त, आणि महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्रीय विकास प्राधीकरण यांचे अधिकारी अशी संयुक्त बैठक आपल्या अध्यक्षतेखाली घेण्यात यावी.

सरतेशेवटी मा.सभापती यांनी जे अधिकारी सभेत अनुपस्थित होते त्याच्याबद्दल तिव्र नाराजी व्यक्त केली यानंतर जे अधिकारी सभेत अनुपस्थित राहील त्यांच्यावर समितीमार्फत कठोर कारवाई करण्यात येईल, प्रधानमंत्री आवास योजनेच्या संदर्भात पुढील सभेमध्ये सविस्तर माहिती घेवुन अधिका–यांनी उपस्थित रहावे त्याचबरोबर या संदर्भात नागपूर सुधार प्रन्यास, म.न.पा. व महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रीय विकास प्राधीकरण यांच्याशी झालेल्या पत्रव्यवहाराची प्रत देण्यात यावी. प्रधानमंत्री आवास योजनेच्या प्रक्रीयेला गती देण्याच्या अनुषंगाने प्रशासनाने सर्वोतोपरी प्रयत्न करावे. यानंतर गलिच्छ वस्ती निर्मुलन व घर बांधणी विशेष समितीची सभा मंगळवार दि. 23/01/2018 रोजी सकाळी 11.30 रोजी घेण्यात येईल व त्या बैठकीमध्ये सर्व अधिका–यांनी आवश्यक माहितीसह उपलब्ध राहण्याचे निर्देश देवुन मा.सभापती यांनी सभा समाप्तीची घोषणा केली.

निगम सचिव
महानगरपालिका, नागपूर

सभापती
गलिच्छ वस्ती,निर्मुलन घरबांधणी विशेष समिती.

**म.न.पा. ठराव क्र. 8 दिनांक 20.03.2017 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 20 (3) नुसार गठीत गलिच्छ वस्ती निर्मुलन व घर बांधणी विशेष समितीची सभा मंगळवार दि. 30.01.2018 रोजी सकाळी 11.30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली, त्या सभेतील चर्चेचा संक्षिप्त वृत्तांत.**

सभेत मा.सभापती, गलिच्छ वस्ती निर्मुलन व घर बांधणी विशेष समिती श्रीमती चेतना टांक, उपसभापती श्रीमती वंदना यंगटवार, मा.सदस्य श्री. मनोज सांगोळे, मा. सदस्य श्री. नरेंद्र वालदे, मा.सदस्य श्री.सुनिल हिरणवार, मा.सदस्या श्रीमती मंगला खेकरे, मा.सदस्या श्रीमती स्नेहा निकोसे तसेच प्रशासनाकडून उपायुक्त श्रीमती रंजना लाडे, अति.उपायुक्त श्री.मोहिते, कार्यकारी अभियंता(स्लम) श्री.जांभुळकर आणि इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरवात केली. सुरूवातीला कार्यकारी अभियंता श्री. जांभुळकर यांनी माहिती देतांना सांगितले कि, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्रिय विकास प्राधीकरण (म्हाडा) ला नोडल एजन्सी म्हणून नियुक्त केले आहे. नागपूर शहराकरिता एन.आय.टी, म्हाडा व महानगरपालिकेच्या माध्यमातुन ही योजना राबवायची आहे. याकरिता जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. नागरिकांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले. इंटरनेटच्या माध्यमातुन 72,013 अर्ज ऑनलॉईन प्राप्त झाले आहे तर 82 हजार ऑफलाईन अर्ज आहेत. या संपुर्ण डाटा म्हाडाकडे पाठविण्यात आला आहे. अर्जाच्या छाननीनंतर 41,418 अर्ज पात्र ठरले आहे. यातून लकी ड्रॉ काढून घरे दिली जातील. एन.आय. टी.कडून मौजा वाठोडा येथे काम सुरू झाले आहे. एस.आर.ए.अंतर्गत घरकुल योजनेत 4064 घरांपैकी 4201 तयार झाले आहेत आणि 3550 घरांचे वाटप करण्यात आले आहे. गोपालनगर येथे 180 पैकी 171 घरांचे वाटप झाले असून 9 घरांचा ताबा द्यावयाचा आहे असेही त्यांनी सांगितले.

कार्यकारी अभियंता श्री.वासनिक यांनी माहिती देतांना सांगितले, आमच्याकडे आलेली लाभार्थ्यांची यादी म्हाडाकडे आणि बॅकेकडे सुध्दा पाठविण्यात आली आहे. ज्या ज्या स्कीमकरिता नागरिक इच्छुक आहेत त्याबाबत त्यांना अर्ज करावा लागेल. या योजनेत बॅकेचीच मुख्य भुमिका राहणार आहे. महानगरपालिकेला फक्त लाभार्थ्यांची यादी बॅकेला द्यावयाची आहे. कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून आर्थिकदृष्टया दुर्बल आणि अल्प उत्पन्न घटकांसाठी परवडणा–या घरांच्या निर्मितीकरिता नियम, निकष दिलेले आहे त्याप्रमाणे बॅकेकडून कर्ज उपलब्ध करून देण्यात येईल. बीएसयुपी योजनेअंतर्गत मौजा नारी मध्ये 3 जागा आणि वांजरा येथे 1 जागा महानगरपालिकेने सुचविलेली आहे. 1,118 घरांचा प्रस्ताव महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्रिय विकास प्राधीकरणाकडे पाठविला आहे. त्यात काही क्युरी आली ती आम्ही दुरूस्त करून पाठविली आहे. जागेचे उपलब्धनुसार घरकुल बनविण्यात येतील. आता नवीन आलेल्या जी.आर.नुसार या योजनेत खाजगी बिल्डर्स् तसेच खाजगी जागेचे मालक यात सहभागी होवू शकतील. कृषी आणि विकास न झालेल्या जागेवर सुध्दा ही स्कीम बनविता येवू शकते असेही त्यांनी सांगितले.

तद्नंतर मा.सभापती यांनी सुचित केले कि, एस.आर.ए. अंतर्गत बांधण्यात येणा–या घरांच्या संदर्भात मोठया प्रमाणात नागरिकांकडून तक्रारी प्राप्त होत आहे त्या ठिकाणी पुरेपुर नागरी सुविधा नसल्यामुळे त्यांना त्रास सोसावा लागत आहे याकडे विभागाने लक्ष देणे आवश्यक आहे. वाठोडा ,एस.आर.ए. स्कीम अंतर्गत जी घरे बांधण्यात आली आहे तेथे समितीच्या सदस्यांसोबत पहाणी करण्याकरिता आज दुपारनंतर 3.00 वाजता दौरा आयोजित करण्यात यावा. कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून आर्थिकदृष्टया दुर्बल आणि अल्प उत्पन्न घटकांसाठी परवडणा–या घरांच्या निर्मितीकरिता नियम, निकष दिलेले आहे त्याची सविस्तर माहिती समिती सदस्यांना देण्यात यावी.

मा.सदस्य श्री.मनोज सांगोळे यांनी सांगितले कि, श्रीकृष्णधाम, मल्का कॉलनी आणि नशेमन हाऊसिंग सोसायटी येथे राहणा–या लोकांची घरे अनधिकृत ठरवून पाडण्यात आल्यामुळे तेथील लोक बेघर झालेले आहे. या लोकांना या योजनेचा फायदा करून देवू शकतो काय? या बेघर झालेल्या लोकांसाठी कोणती योजना अंमलात आणु शकतो काय? या अनुषंगाने

शासनाशी पत्रव्यवहार करण्यात यावा तसेच पंतप्रधान आवाज योजनेअंतर्गत म्हाडा, एन.आय.टी. आणि बॅंकेच्या अधिका–यांची बैठक लावण्यात यावी असे सुचित केले.

मा.सदस्य श्री.सुनिल हिरणवार यांनी पंतप्रधान आवास योजनेचा प्रचार प्रसार मोठया प्रमाणात करण्यात यावा असे सुचविले. सभेत होणा–या चर्चेवर आणि मा.सदस्यांनी मागितलेल्या माहिती संबंधित विभागाने लक्ष देवून माहिती पुरवावी असे सुचविले.

उपायुक्त श्रीमती रंजना लाडे यांनी सभेत माहिती देतांना सांगितले कि, नागपूर महानगरपालिकेच्या विद्यमाने होणारा उद्योजिका मेळावा रेशिमबाग येथे दिनांक 4 फेब्रुवारी ते 11 फेब्रुवारी या कालावधीत होणार आहे. दि. 4 फेब्रुवारी रोजी सायंकाळी 7.00 वाजता उद्घाटन सोहळा आयोजित करण्यात आलेला आहे.

शेवटी मा.सभापती श्रीमती चेतना टांक यांनी निर्देशित केले, आवास योजनेबाबत प्रत्येक प्रभागातील लोक प्रश्न विचारू लागले आहेत. या योजनेचे प्रारूप व पात्र नागरिकांची यादी जाहीर न केल्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे योजनेच्या कामाला गती द्यावी व त्याची माहिती वेळोवेळी नगरसेवकांना देण्यात यावी. जेणेकरून मा. सदस्यांना नागरिकांना माहिती देता येईल. ज्या ठिकाणी आवास योजनेचे काम सुरू आहे त्याची पाहणी समिती सदस्यांकडून करण्यात येईल जेणेकरून नागरिकांना याबाबत माहिती देता येईल. एसआरए अंतर्गत तयार झालेल्या घरकुलाचा ताबा नागरिकांना ताबडतोब देण्यात यावा. केटीनगरचे एसआरएचे कार्यालय महानगरपालिकेच्या सिव्हील कार्यालयात स्थानांतरीत करण्यात यावे जेणेकरून नागरिकांना समन्वय साधण्यास सोयीचे होईल असे मा.सभापती यांनी निर्देशित करून सभा समाप्तीची घोषणा केली.

**निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**सभापती**
**गलिच्छ वस्ती निर्मुलन व घर बांधणी विशेष समिती**

D:\Sub commitee 2017\Glicha vasti nirmulan ghar bhandhni vishesh samitee\2018\30-01-2018.docx